सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानीत वसतीगृहातील कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक:- बैठक-२०१७/प्र.क्र. ३०८/शिक्षण-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०८ जुलै , २०१९

वाचा:- १.सा.न्या.व वि.स.विभाग,शासन निर्णय,क्रमांक: बीसीएच-२००९/ प्र.क्र.३३९/शिक्षण-२ दिनांक १५ जून,२०१३

प्रस्तावना :-

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करता यावा,ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधील शाळागळतीचे प्रमाण कमी व्हावे,आर्थिक दुरवस्थेमुळे मागासवर्गीय पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणात अडचणी येऊ नये आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा,या उद्देशाने सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानीत वसतीगृहे चालविण्यात येतात. या अनुदानित वसतीगृहाच्या कर्मचा-यांच्या मानधनामध्ये वित्त विभागाच्या मान्यतेने उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णय,दिनांक १५ जून, २०१३ अन्वये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तद्नंतर सदर मानधनामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.परंतु सदर मानधनात वाढ करण्याबाबत संबंधीत कर्मचारी संघटना तसेच लोकप्रतीनिधींमार्फत वारंवार मागणी करण्यात येत असल्याने त्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद वस्तुस्थिती पाहता,सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या अनुदानीत वसतीगृहातील कर्मचा-यांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १५ टक्के मानधन वाढ देण्यात येत आहे.

अक्र.	पदनाम	चालू मानधन	नवीन मानधनाचा दर/प्रतीमाह
१	२	३	४
१	अधिक्षक	८०००	९२००
२	स्वयंपाकी	६०००	६९००
३	मदतनीस	५०००	५७५०
४	चौकीदार	५०००	५७५०

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. अनौसं क्र. २९३/व्यय-१४, दिनांक २५.०७.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०१९०७०८१५२४१११६२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.07.08 15:31:59 +05'30'

(अ.कों.अहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२. मा. मंत्री (सा. न्या. व वि. स.) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (सा. न्या. व वि. स.) यांचे खाजगी सचिव
४. प्रधान सचिव (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे स्वीय सहायक
५. महालेखापाल (महाराष्ट्र -१/२), (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
६. मुख्य कार्यकारी,जिल्हा परिषद सर्व.
७. अतिरीक्त मुख्य कार्यकारी,जिल्हा परिषद सर्व
८. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण
९. सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण
१०.सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण.
११.निवडनस्ती (शिक्षण-२)